# पोलीस अधीक्षक कार्यालय जळगांव
# 'प्रेस नोट'

दि. 09/07/2025

---

## विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी जळगांव पोलीसांचे " She Team " (दामिनी पथक) सक्रीय- टवाळखोरांवर कडक कारवाई !

शाळा व महाविद्यालय परीसरातील विद्यार्थिनी आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी जळगांव पोलीसांनी पुन्हा एकदा ठोस अणि जनहितकारी पावले उचलली आहेत. " She Team " ( दामिनी पथक ) च्या माध्यमातुन जळगांव शहरातील शाळा-महाविद्यालय परीसरात गस्त वाढविण्यात आली असुन टवाळखोरी करणाऱ्या व छेडछाड करणाऱ्या मुलांवर पोलीसांकडुन तात्काळ अणि प्रभावी करवाई करण्यात येत आहे. त्याकरीता प्रत्येक पो.स्टे. येथुन 02 पुरुष व 01 महिला अंमलदार असे एकुण 12 पुरुष अंमलदार व 06 महिला अंमलदार यांची नियुक्ती करण्यात येत असुन शाळा महाविद्यालय परीसरात शाळा सुरु व सुटण्याच्या वेळेला नियमित गस्त घालण्यात येत आहे.

आज दि. 09/07/2025 रोजी " She Team " (दामिनी पथक) गस्त घालत असतांना मेहरुण तलाव परीसरातील सेंट टेरेसा स्कुल व ज्युनियर कॉलेज, नुतन मराठा कॉलेज, एम.जे. कॉलेज परीसर, बेंडाळे कॉलेज, का.ऊ. कोल्हे विद्यालय व कॉलेज, खुबचंद सागरमल विद्यालय समोर काही तरुण हे विनाकारण शाळेच्या गेटसमोर थांबुन विद्यार्थिनींना पाहुन अश्लील वर्तन करीत होते. दामिनी पथकातील पोलीस अंमलदार यांनी त्वरीत कारवाई करत अशा 09 तरुणांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 112/117 अंतर्गत प्रतिबंधात्क कारवाई केली असुन 25 तरुण यांना समज देवुन सोडण्यात आले आहे.

सदरच्या कारवाईने परीसरातील पालक वर्ग व विद्यार्थिनींमध्ये एक सकारात्मक व सुरक्षीततेच्या भावनांचा जागर झाला असुन पोलीसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सदरची मोहिम ही मा. पोलीस अधीक्षक, डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, श्री अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री संदीप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली जळगांव उपविभागातील सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी व दामिनी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकडुन यशस्वीरित्या राबविली जात आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

प्रति,

संपादक, दैनिक-----------

कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.


श्रीमती आनंदीबाई दशमुख बालक मंदीर
मंदीर प्राथमिक शाळा, जळगांव.
Shot on OnePlus
Jalgaon,Nashik Division 2025.07.05 10:37
Powered by Triple Camera


Shot on OnePlus



